# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
## कृषि नगर, वसमत रोड परभणी

| ई मेल : | reg_mau@rediffmail.com | दुरध्वनी : | 02452 - 229755 |
|---|---|---|---|
| वेबसाईट : | www.vnmkv.ac.in | फॅक्स : | 02452 - 223582 |


विद्यापीठ विधिज्ञ मंडळावरील विधीज्ञाच्या व्यावसायिक शुल्कामध्ये दिनांक ०१/१०/२०२३ पासून शुल्कवाढ लागू करणेबाबत.

## परिपत्रक

क्र.२०२३/न्यायप्र/वि.नि./आस्था-५/4947

दिनांकः- ०७/११/२०२३

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांकडे विविध यंत्रणांची सेवाविषयक / जमिनी/ इतर संबंधात न्यायालयीन प्रकरणे आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरीता विद्यापीठाने विद्यापीठ विधिज्ञ मंडळावर विधीज्ञांच्या नेमणुकीकरीता अर्ज मागवून मा. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, जिल्हा व सत्र न्यायालय, इत्यादी यंत्रणा येथे विद्यापीठाच्या वतीने प्रभावीपणे बाजू मांडण्याकरिता अनुभवी विधीज्ञांच्या सेवा विद्यापीठ विधिज्ञ मंडळावर नियुक्त करून घेतल्या आहेत. विद्यापीठ विधिज्ञ मंडळावर नियुक्त विधीज्ञांकडे देण्यात आलेली प्रकरणे दिर्घकाळ न्यायालयात सुरु राहत असल्यामुळे आणि प्रकरणी अनेक वेळा सुनावण्या होत असल्यामुळे विद्यापीठ विधिज्ञ मंडळावरील विधीज्ञांकडून व्यावसायिक शुल्कामध्ये वाढ करण्याची मागणी होत असल्याने विधीज्ञांच्या व्यावसायिक शुल्कामध्ये सुधारणा करण्याचे विद्यापीठाच्या विचाराधीन होते.

त्यानुषंगाने विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या २११ व्या बैठकीमध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी करीता स्थापित विद्यापीठ विधिज्ञ मंडळावरील विधीज्ञाच्या व्यावसायिक शुल्कामध्ये सुधारणा (वाढ) करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठ कार्यकारी परिषद समोर विचारार्थ सादर करण्यात आला. सदर प्रस्तावावर चर्चा होवून कार्यकारी परिषदेने विषय क्र. १७ अन्वये विद्यापीठ विधिज्ञ मंडळावरील विधीज्ञाच्या शुल्कामध्ये दि. ०१/१०/२०२३ रोजी किंवा त्यानंतर नव्याने विद्यापीठा विरोधात दाखल होणाऱ्या आणि विद्यापीठाच्या वतीने दाखल करण्यात येणाऱ्या याचिका प्रकरणी कार्यकारी परिषद ठराव क्र.का-१११/२११/दि.२१/०८/२०२३ प्रमाणे वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान केलेली आहे.

तेव्हा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी करीता स्थापित विद्यापीठ विधिज्ञ मंडळावरील विधिज्ञांना विविध यंत्रणांची न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरीता सोबतच्या "परिशिष्ठ-अ" मध्ये सुधारित केल्याप्रमाणे व्यावसायिक शुल्क याद्वारे लागू करण्यात येत आहे.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.....

(पु.को. काळे) ७.११.२३

कुलसचिव

**प्रतिलिपी**:-मा. कुलगुरू महोदय, वनामकृवि, परभणी यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव.

**प्रत**:-

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/ संचालक संशोधन/ संचालक, विस्तार शिक्षण संचालनालय, वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते कि आपल्या अधिनिस्त सर्व कार्यालयांना याबाबत योग्य ते आदेश देण्यात यावेत.
२. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता/उप कुलसचिव (आस्था/साप्रवि/विद्या) यांना माहिती तथा योग्य त्या कार्यावाहीस्तव.
३. प्रभारी अधिकारी, संगणक केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, आपणास पुरविण्यात आलेले परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

"परिशिष्ठ-अ"

## विद्यापीठ विधिज्ञ मंडळावरील विधीज्ञ यांच्या व्यावसायिक शुल्कामध्ये सुधारणा करणे.

१) विद्यापीठाविरुद्ध दाखल होणाऱ्या याचिका प्रकरणी.

| अ.क्र. | प्रचलित दर (दिनांक ०१.०१.२०२० नुसार) (ठराव क्रमांक का-७३/२४.१२.२०१९) | प्रस्तावित दर (दिनांक - ०१.१०.२०२३) |
|---|---|---|
| १ | विद्यापीठ विधिज्ञ मंडळावर नेमणूक करण्यात आलेल्या उच्च न्यायालयातील विधिज्ञांना प्रत्येक न्यायालयीन प्रकरणी विधिज्ञ शुल्क (रिट याचिका स्वीकारणे, शपथपत्र दाखल करुन अंतीम सुनावणी पर्यत) रुपये ७,०००.०० इतर किरकोळ खर्च, स्टेशनरी, झेरॉक्स व टकंलेखन खर्च ई. करीता रुपये ३,०००.०० - **एकुण रुपये १०,०००.००** | १. विधिज्ञ शुल्क रिट याचिका स्वीकारणे ते प्रकरण अंतिम निकाली निघेपर्यत (सिव्हिल अर्जा सह) रुपये १२,०००.०० २. शपथपत्र दाखल करणे, किरकोळ खर्च, स्टेशनरी, झेरॉक्स व टकंलेखन ई. रुपये ४०००.०० **एकुण रुपये १६,०००.००** |
| २ | सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणे चालविण्याकरीता नेमणूक करण्यात आलेल्या विद्यापीठ विधिज्ञ मंडळावरील विधिज्ञाचे विधिज्ञ शुल्क रुपये ४०,०००.०० इतर किरकोळ खर्च जसे स्टेशनरी, झेरॉक्स व टकंलेखन खर्च, भाषांतर, पोस्टेज ई. रुपये १०,०००.०० **एकुण रुपये ५०,०००.००** (परिस्थिती अनुसरुन देयकात कमी वा जास्त अदायगीचा अधिकारी मा. कुलगुरु यांना असेल) | १.विद्यापीठ विधिज्ञ मंडळावरील विधिज्ञाचे विधिज्ञ शुल्क रुपये ६०,०००.०० २.इतर किरकोळ खर्च जसे स्टेशनरी, झेरॉक्स व टकंलेखन खर्च, भाषांतर, पोस्टेज ई. रुपये १०,०००.०० **एकुण रुपये ७०,०००.००** (परिस्थिती अनुसरुन देयकात कमी वा जास्त अदायगीचा अधिकारी मा. कुलगुरु यांना असेल). |
| ३ | कामगार न्यायालय/औद्यागीक न्यायालय/दिवाणी न्यायालय/जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच/न्यायालय ई. न्यायालयीन प्रकरणे चालविण्याकरीता नेमणूक करण्यात आलेल्या विधिज्ञांना त्यांचे प्रकरणनिहाय शुल्क रुपये ७०००.०० एवढे अनुज्ञेय असेल. (विद्यापीठा विरोधात दाखल याचिका प्रकरणी) | १.विधिज्ञ शुल्क याचिका स्विकारणे ते प्रकरण अंतिम निकाली निघेपर्यत (सिव्हिल अर्जासहीत) रुपये १०,०००.०० २.शपथपत्र दाखल करणे, स्टेशनरी, झेरॉक्स व टकंलेखन खर्च, भाषांतर, पोस्टेज व इतर किरकोळ खर्च रुपये २,०००.०० असे **एकुण रुपये १२,०००.००** (परिस्थिती अनुसरुन देयकात कमी वा जास्त अदायगीचा अधिकारी मा. कुलगुरु यांना असेल) |

**२) विद्यापीठाच्या वतीने विविध न्यायालयात दाखल करण्यात येणाऱ्या अपील/याचिका प्रकरणी.**

| | | |
|---|---|---|
| ४ | विद्यापीठाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील/याचिका दाखल करणे प्रकरणी शुल्क. | **रुपये ७०,०००/-** ( विधिज्ञ शुल्क रु.६०,०००/- आणि याचिका दाखल करणेस्तव लागणारा किरकोळ खर्च रु.१०,०००/-) (याचिकेचा मसुदा तयार करणे, झेरॉक्स व टकंलेखन खर्च, स्टेशनरी, मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल करणेस्तव लागणारा तिकीट खर्च व किरकोळ खर्च ईत्यादी सहित प्रकरण/याचिका निकाली निघेपर्यंत व्यावसायिक शुल्कासह सर्व एकत्रीत खर्च) |
| ५ | विद्यापीठाच्या वतीने मा. उच्च न्यायालयामध्ये अपील/याचिका दाखल करणे प्रकरणी शुल्क. | **रुपये २४,०००/-** (विधिज्ञ शुल्क रु.१२,०००/- आणि याचिका दाखल करणेस्तव लागणारा किरकोळ खर्च रु.१२,०००/-) (याचिकेचा मसुदा तयार करणे, झेरॉक्स व टकंलेखन खर्च, स्टेशनरी, मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल करणेस्तव लागणारा तिकीट खर्च व किरकोळ खर्च ईत्यादी सहित प्रकरण/याचिका निकाली निघेपर्यंत व्यावसायिक शुल्कासह सर्व एकत्रीत खर्च) |
| ६ | विद्यापीठाच्या वतीने मा. कामगार न्यायालय/ औद्यागीक न्यायालय / दिवाणी न्यायालय/ जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच/ इतर न्यायालय ई. मध्ये अपील/याचिका दाखल करणे प्रकरणी शुल्क. | **रुपये १४,०००/-** (विधिज्ञ शुल्क रु.१०,०००/- आणि याचिका दाखल करणेस्तव लागणारा किरकोळ खर्च रु.४,०००/-) (याचिकेचा मसुदा तयार करणे, झेरॉक्स व टकंलेखन चार्ज, किरकोळ स्टेशनरी, मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल करणेस्तव लागणारा तिकीट खर्च व किरकोळ खर्च ईत्यादी सहित प्रकरण/याचिका निकाली निघेपर्यंत सर्व एकत्रीत खर्च) |

३) इतर कायदेशीर प्रकरणासंबंधी बाबी

| | | |
|---|---|---|
| ७ | कायदेशीर सल्ला | १. कायदेशीर सल्ला नियमित प्रकरणे तथा मा. न्यायालयाच्या निकालावर कायदेशीर सल्ला, स्पष्टीकरण, शपथपत्र पडताळणी ई. रुपये ३,०००.०० |
| ८ | विद्यापीठाच्या वतीने मा. न्यायालयामध्ये कॅव्हेट दाखल करणे | १. मा. सर्वोच्च न्यायालय रु.१०,०००/-<br>२. मा. उच्च न्यायालय रु.५,०००/-<br>३.इतर सर्व कनिष्ठ न्यायालये रु.३,०००/- |
| ९ | एखाद्या व्यक्तीस अथवा एखाद्या कार्यालयास विद्यापीठ पॅनलवरील वकिलामार्फत कायदेशीर नोटीस पाठवणे. | रुपये २०००/- |
| १० | विद्यापीठाच्या विधिज्ञमंडळावर विधिज्ञ नेमण्याचे व नेमलेल्या विधीज्ञांपैकीपैकी कोणत्याही विधीज्ञाचे नाव वगळण्याबाबतचे सर्व अधिकार | पूर्ण अधिकार मा.कुलगुरू |
| ११ | विद्यापीठाची प्रकरणे विविध न्यायालयात जसे : कामगार न्यायालय / औद्योगिक न्यायालय/ दिवाणी न्यायालय/ जिल्हा व सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयात तसेच सर्वोच्च न्यायालयात प्रकरण चालविण्यासाठी विशेष परिस्थितीत विशिष्ट / नवीन / अतिरिक्त विधिज्ञाची नेमणूक करणे किंवा विधिज्ञ मंडळावरील विधीज्ञांच्या व्यतिरिक्त विधीज्ञांची नांवे निश्चित करणे आणि त्यांचे व्यावसायिक शुल्क ठरवणे व त्यास मंजुरी देणे बाबतचे अधिकार | पूर्ण अधिकार मा.कुलगुरू |

(पु.को. काळे) ७-११
कुलसचिव